महाराष्ट्र शासन

क्रमांक : अध्यर २०१७/प्र.क्र. ५६/१७/परिचर्या
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०३ मे २०१८.

विषय:- पी.बी.बी.एस्सी व एम.एस्सी.(नर्सिंग) या अभ्यासक्रमांसाठी खासगी शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या सेवांतर्गत उमेदवारास अध्ययन रजा मंजूर करणेबाबत...

वाचा :- शासन परिपत्रक, क्र.एनयुआर-१४१४/प्र.क्र.१२९/शिक्षण-२, दिनांक ०७.०६.२०१४.

पूरकपत्र :-

उपरोक्त वाचा येथील शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.४ (२) मधील मजकूर,

४(२) - "उक्त दोन अभ्यासक्रमास सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित न करता सेवांतर्गत उमेदवारांच्या प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांमधून निवड समितीमार्फत संबंधीत अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावेत. उर्वरित प्रवेश पूर्णत: गुणवत्ता विचारात घेऊन देण्यात येतील. खासगी नर्सिंग संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या सेवांतर्गत उमेदवारास अध्ययन रजा अनुज्ञेय ठरणार नाही."

ऐवजी,

"उक्त दोन अभ्यासक्रमास सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित न करता सेवांतर्गत उमेदवारांच्या प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांमधून निवड समितीमार्फत संबंधीत अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावेत. उर्वरित प्रवेश पूर्णत: गुणवत्ता विचारात घेऊन देण्यात येतील. परिचर्या प्रवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांना शासकीय परिचर्या शिक्षण संस्थेतील जागांवर काही कारणाने प्रवेश न मिळता खासगी नर्सिंग संस्थांमध्ये प्रवेश मिळाल्यास सदर सेवांतर्गत कर्मचाऱ्यांना अध्ययन रजा अनुज्ञेय ठरेल. मात्र संबंधित कर्मचाऱ्याने शासकीय नर्सिंग संस्थामधील राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत भाग घेतलेला असावा." असा वाचण्यात यावा."

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३१६५६४१२११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prakash Babanrao Surwase

Digitally signed by Prakash Babanrao Surwase
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb1adbd5d5d31cf6d91c86149c955a6822b4fea3e4ec334c18e2c6f96cc5301b, cn=Prakash Babanrao Surwase
Date: 2018.05.03 17:07:40 +05'30'

(प्रकाश सुरवसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.निवडनस्ती (परिचर्या).